मेहकरमध्ये अभूतपूर्व चुरस! अध्यक्षपदासाठी २० तर नगरसेवकपदासाठी ३२५ उमेदवार >>पान 2

संवादातून, सर्वांच्या सहभागातून समृद्ध राज्य साकारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

अवैध गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या ४७ विना नंबर टिपर वाहनांवर जिल्हाधिकारी यांची धडक कारवाई >>पान 4

**सुविचार**

''स्वतःवर विश्वास ठेवा, यश आपोआप मिळेल.''


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 104 ■ मंगळवार, दि. 18 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




किंग खानच्या फॅन फॉलोइंगचा नाद खुळा, शाहरुख खानच्या नावानं बांधतायत ४००० कोटींची बिल्डिंग

आतील पान

# नितीश कुमारांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

## भाजपच्या गोटात पडद्यामागील घडामोडींना वेग

**पाटणा : विधानसभा निवडणुकीनंतर बिहारमध्ये सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. बिहारच्या यंदाच्या निवडणुकीतच भाजपला ८९ जागा तर नितीश कुमार यांच्या जेडीयूला ८५ जागा मिळाल्या. त्यानंतर राज्यात कुणाचा मुख्यमंत्री विराजमान होणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. अशातच आज नितीश कुमार यांनी राजभवनात राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांना आपला राजीनामा सादर केला.**



आज दुपारी राज्य मंत्रिमंडळाची औपचारिक बैठक झाली. सध्याच्या नितीश मंत्रिमंडळाची ही शेवटची बैठक होती, ज्यामध्ये मंत्रिमंडळ बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री नितीश कुमार शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी पटनातील जुन्या सचिवालयात पोहोचले. मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर, नितीश कुमार राजभवनात गेले आणि त्यांनी औपचारिकपणे राज्यपालांना आपला राजीनामा सादर केला. मुख्यमंत्री नितीश कुमार पुन्हा २० नोव्हेंबर रोजी शपथ घेण्याची अपेक्षा आहे. पाटण्याच्या ऐतिहासिक गांधी मैदानावर शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांच्या नावाची औपचारिक पुष्टी होण्याची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. १८ नोव्हेंबर रोजी होणारी भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक आता बुधवार, १९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. बिहार भाजप अध्यक्ष दिलीप जयस्वाल यांच्या विधानानंतर, मंगळवारी होणाऱ्या भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नवीन नेता निवडला जाईल आणि त्यानंतर त्यांच्या आघाडीतील भागीदारांना मुख्यमंत्रीपदासाठी नितीश कुमार यांना पाठिंबा देण्याचे औपचारिक पत्र सादर केले जाईल असे मानले जात होते. परंतु आता ही बैठकीसाठी वाट पाहावी लागणार आहे.

१७ वी विधानसभा विसर्जित झाल्यानंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यपालांकडे आपला राजीनामा सादर केला. आता ते दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. माध्यमांच्या माहितीनुसार, राजीनामा सादर केल्यानंतर नितीश कुमार आपल्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत महत्त्वाची बैठक घेण्याची शक्यता आहे.

नवीन सरकार स्थापन होईपर्यंत नितीश कुमार कार्यवाहक मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. दरम्यान, बिहार मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते विजय चौधरी आणि सम्राट चौधरी यांच्यासह रवाना झाले. दोन्ही नेते बैठकीला उपस्थित होते. त्यानंतर सम्राट चौधरी हेही नितीश कुमार यांच्यासोबत राजभवनात गेले.

# बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना फाशीची शिक्षा

## बांगलादेश कोर्टाने विद्यार्थ्यांच्या हत्येचे दोषी मानले; युनूस म्हणाले- भारताने शेख हसीना यांना सोपवावे

नवी दिल्ली : बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना एका आंदोलन प्रकरणात दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरण कोर्टाने ही फाशीची शिक्षा सुनावली. सन २०२४ साली बांगलादेशमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनप्रकरणी त्यांच्यावर खटला सुरू होता, त्यात आज न्यायालायने महत्पूर्ण निकाल दिला. २०२४ च्या या आंदोलनानंतर शेख हसीना यांना देश सोडावा लागला होता. या हिंसक आंदोलनामध्ये हत्या आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचे आरोप माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर ठेवण्यात आले होते. मात्र, शेख हसीना यांच्याकडून हे आरोप स्पष्टपणे फेटाळून लावण्यात आले आहेत. दरम्यान, या हिंसाचाराच्या घटनेनंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर बांगलादेशात मोहम्मद युनूस यांचं सरकार स्थापन झालं होतं.

बांगलादेशमध्ये सरकारविरुद्ध उफाळलेल्या जनक्षोभावेळी करण्यात आलेल्या गोळीबाराच्या घटनेवरुन शेख हसीना यांच्यावर मानवतेविरुद्धचा खटला दाखल करण्यात आला होता. सन २०२४ च्या जुलै महिन्यात सरकारविरोधात मोठं आंदोलन उभारण्यात आलं होतं, दोन महिने चाललेल्या या आंदोलनादरम्यान १४०० नागरिकांची हत्या झाली, तर जवळपास २५ हजार जखमी झाले होते, अशी माहिती मुख्य अभियोक्ता ताजुल इस्लाम यांनी न्यायालयात सुनावणीवेळी दिली. या खटल्यात त्यांना दोषी ठरवत बांगलादेशमधील आयसीटी न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. शेख हसीन सध्या भारतात राहत असून त्यांच्या अनुपस्थितीतच त्यांच्याविरुद्ध हा खटला चालवण्यात आला. ४५३ पानांच्या या निर्णयाचे वाचन



करण्यापूर्वी न्यायमूर्ती मोहम्मद गुलाम मुर्तजा मजूमदार यांनी हा निर्णय ६ भागांमध्ये सुनावणी केला जाईल असे सांगितले होते. बांगलादेशमधील टेलिव्हीजनवर या निकालाच्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते.

शेख हसीना यांनी परिस्थिती हाताळण्याची आणि हिंसा रोखण्याची जबाबदारी सक्षमपणे पार पाडली नाही. न्यायालयात सादर पुराव्यांवरुन असेही दिसून येते की, पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) देखील या प्रकरणात दोषी असू शकतात.

# राज्यभरात तापमानाचा पारा घसरला, परभणीत थंडीचा कडाका कायम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील बहुतांश भागात थंडीचा कहर पाहायला मिळत आहे. जवळ जवळ सर्वच जिल्ह्यात किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली असून सर्वत्र थंडीची लाट पसरल्याचे चित्र आहे. दरम्यान पुढील आठवडाभर मुंबई पुण्यासह कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात थंडीची हुडहुडी कायम असणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर वाढत्या थंडीमुळं ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोबतच राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांपासून मराठवाड्यापर्यंत पुढील काही दिवसांत तापमानात लक्षणीय घसरण होईल, असा इशाराही हवामान विभागाने दिला आहे.

राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय वातावरण तापत असताना दुसरीकडे मात्र थंडीचा कडाका देखील जाणवण्यास सुरुवात झाली आहे. रविवारी धुळ्यात ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. या थंडीचा आनंद घेण्यासाठी नागरिक सकाळीच घराबाहेर पडण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही दिवसांमध्ये थंडीचा कडाका अजून वाढणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. थंडीमुळे जागोजागी शेकोट्या पेटू लागल्या असून उबदार कपड्यांच्या विक्रीत देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

परभणी शहरासह जिल्ह्यात मागच्या आठवडा भरापासून थंडीची लाट कायम आहे. तापमान हे १० अंशखाली गेल्याने प्रचंड गारठा निर्माण झालाय. हवेमध्ये गारवा असल्याने दिवसभर थंडी कायम राहत आहे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, वृध्द,नागरिकांकडून उबदार कपड्यांचा वापर केला जातोय. तसेच सकाळी ग्रामीण भागातून शहरात येणारे दूध विक्रेते, भाजी विक्रेते यांना या थंडीचा जास्त फटका बसत आहे. थंडीपासून बचावासाठी ग्रामीण भागासह शहरातही शेकोट्या पेटत आहेत. दुसरीकडे रबी पीक ज्यात गहू, हरभरा या साठी ही थंडी पोषक आहे.

महाबळेश्र्वर मिनी काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्र्वरमध्ये गेल्या काही दिवसांपासून थंडीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. आठ दिवसांपासून तापमानात घसरण होऊ लागल्याने थंडीचा कडाका वाढू लागला आहे. दिवसभर कडक ऊन आणि रात्री गारठा वाढू लागला आहे. या कडाक्याच्या थंडीसोबतच गार वारेही वाहत असल्याने पर्यटनास आलेल्या पर्यटकांसह स्थानिक नागरिक थंडीत गारठले आहेत.महाबळेश्र्वर शहरामध्ये किमान १०.२अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत असून, वेण्णा लेक परिसरात त्याहून तापमानाची कमी नोंद होत आहे.. थंडीच्या प्रमाणात वाढ झाल्याने सकाळी वेण्णा लेकवर पर्यटक फिरकत आहेत. कडाक्याची थंडी ही महाबळेश्र्वरची नजाकत दाखवत असून, या थंडीमुळे निसर्गाची विविध आकर्षक रूप आणि सृष्टीसौंदर्य पाहवयास मिळत आहे.

# मेहकरमध्ये 'किशोर वादळ'!

## साधेपणात दाखल उमेदवारी अर्ज, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मेहकर :** मेहकर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचाली वेग धरत आहेत. त्यातच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे यांनी १७ नोव्हेंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज साध्या आणि शिस्तबद्ध पद्धतीने दाखल केला. कोणतेही शोभिवंत प्रदर्शन, मिरवणूक किंवा मोठा कार्यक्रम न करता, पूर्णतः संयमित वातावरणात अर्ज दाखल करण्यात आला. मात्र, यावेळी उपस्थित नागरिक, कार्यकर्ते आणि समर्थकांची स्वयंस्फूर्त उपस्थिती उल्लेखनीय होती. शहरातील अनेक भागांतून नागरिकांनी स्वतःहून उपस्थित राहून गारोळे यांना समर्थन दिले. त्यामुळे शक्तीप्रदर्शन न करता देखील मजबूत जनआधार जाणवला, असे निरीक्षण व्यक्त केले जात आहे.



**किशोर गारोळे : विकासाचा अजेंडा ठामपणे मांडणारे उमेदवार**

अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना किशोर गारोळे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली. त्यांनी विरोधकांवर कोणतीही टीका न करता फक्त आणि फक्त विकासाच्या मुद्द्यावर भर दिला. ते म्हणालेमेहकर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. आमची लढत कोणत्याही व्यक्तीशी किंवा पक्षाशी नाही; आमची लढत विकासाशी आहे. शहरातील मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते आणि नागरिक सेवा यांमध्ये सुधारणा करणे हे आमचे प्राधान्य असेल.''

गारोळेंच्या या सकारात्मक आणि संघर्षविरहित भूमिकेचे अनेकांनी स्वागत केले. विशेषतः तरुण मतदारांमध्ये गारोळे यांच्याबद्दलचा कल वाढत असल्याचे दिसत आहे.

**सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात अर्ज दाखल**

उमेदवारी वेळी कोणताही प्रकल्पित कार्यक्रम नसतानाही शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, शिवसैनिक, महिला आघाडी व युवासेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात, उप जिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुका अध्यक्ष निंबाजी पांडव, ॲड आकाश घोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी किशोर गारोळे यांच्या उमेदवारीचे समर्थन करताना सांगितले उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका, विचार आणि नेतृत्वावर मेहकरकरांचा कायम विश्वास आहे. शहराच्या विकासासाठी प्रामाणिक, अभ्यासू आणि जनतेशी जोडलेले नेतृत्व म्हणून किशोर गारोळे हेच योग्य पर्याय आहेत.'' आमदारांच्या या वक्तव्याने उमेदवारी अर्ज प्रक्रियेला अधिक बळकटी मिळाली. तर या नैसर्गिक जमावाला 'किशोर गारोळे यांच्यावरील विश्वास' असे स्वरूप मिळत असल्याचे शहरात चर्चिले जात आहे. २५ नोव्हेंबरनंतर अंतिम रिंगण स्पष्ट उमेदवारी अर्जांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार असून अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २५ नोव्हेंबर आहे. त्यानंतर मेहकर नगरपरिषद निवडणुकीचे अंतिम रिंगण स्पष्ट होईल. शहरात शांत, संयत पण तितकाच उत्साही प्रचार सुरू आहे. प्रत्येक गल्लीत निवडणुकीचे राजकारण चर्चेचा विषय ठरले आहे.

### काँग्रेसचे विलास चनखोरे शिवसेनेत

काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे इच्छुक उमेदवार विलास चनखोरे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावरील विश्वास तसेच आमदार सिद्धार्थ खरात यांच्या विकासदृष्टिकोनामुळे त्यांनी पक्षांतरणाचा निर्णय घेतल्याचे समजते. या प्रवेशामुळे शिवसेनेची ताकद मेहकरमध्ये अधिक वाढली असून चनखोरे यांचा चाहता वर्गही शिवसेनेमध्ये एकवटला आहे. त्यामुळे नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेची बाजू अधिक भक्कम होत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.



**उमेदवारी अर्जांमुळे रंगत आणखी वाढली**

किशोर गारोळे यांनी कोणताही दिखाऊ कार्यक्रम न करता साधेपणात उमेदवारी अर्ज दाखल केला असला तरी नागरिकांची स्वयंस्फूर्त उपस्थिती, आमदार सिद्धार्थ खरात यांचे नेतृत्व आणि काँग्रेसचे विलास चनखोरे यांचा प्रवेश या तिन्ही घटकांनी मेहकर नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची स्थिती अधिक मजबूत झाल्याचे संकेत मिळत आहेत.

## चुकलेली संघ निवड पराभवास जबाबदार

दक्षिण आफ्रिकन क्रिकेट संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर असून या दौऱ्यातील पहिला कसोटी सामना कोलकाता येथील ईडन गार्डनच्या मैदानावर खेळला गेला. या पहिल्या कसोटीत भारत दक्षिण आफ्रिकेला सहज नमवून मालिके १- ० अशी आघाडी घेईल अशी अपेक्षा क्रिकेट प्रेमींना होती मात्र प्रत्यक्षात उलटेच घडले. या कसोटीत दक्षिण आफ्रिकन संघानेच भारतीय संघाचा ३० धावांनी आश्र्चर्यकारक पराभव केला. रविवारी कसोटीच्या तिसऱ्या दिवशी चौथ्या डावात भारतीय संघाला विजयासाठी आवश्यक असणाऱ्या अवघ्या १२३ धावा काढता न आल्याने मानहानीकारक पराभवास सामोरे जावे लागले. भारतीय संघाचा हा पराभव का झाला याची चर्चा क्रिकेट विश्र्वात रंगू लागली आहे. काहीजण या पराभवास खेळपट्टीस जबाबदार धरत आहे. संघ व्यवस्थापनाने अद्याप या पराभवाचे विश्र्लेषण केले नसले तरी ते ही या पराभवास खेळपट्टीस जबाबदार धरत आहे असे त्यांच्या एकूण देहबोलीवरून वाटते. संघ व्यवस्थापन खेळपट्टीस जबाबदार धरून स्वतःवरील जबाबदारी झटकत आहे. ही कसोटी ज्या खेळपट्टीवर खेळवण्यात आली होती ती फिरकीस धार्जिणी होती हे मान्य केले तरी याच खेळपट्टीवर पाहुण्या दक्षिण आफ्रिकन फलंदाजांनी भारताच्या चार फिरकी गोलंदाजांना तोंड देत पहिल्या डावात दीडशतकी व दुसऱ्या डावात शतकी धावा काढल्या. त्यांचा कर्णधार टेंबा बवुमा याने याच खेळपट्टीवर नांगर टाकून धीरोदत्तपणे अर्धशतक झळकावले. भारतीय फलंदाजांना मात्र या धावा काढताना नाकी नऊ आल्या कारण या कसोटीसाठी जी संघाची निवड करण्यात आली होती तीच मुळात चुकीची होती. भारतीय संघात चार फिरकी गोलंदाज आणि दोन वेगवान गोलंदाज खेळवण्यात आले होते. भारतीय संघात तीन दर्जेदार फिरकी आणि दोन वेगवान गोलंदाज असताना चौथ्या फिरकी गोलंदाजांची गरज नव्हती त्या ऐवजी एक स्पेशालिस्ट फलंदाज खेळवला असता तर त्याचा संघास फायदा झाला असता. त्यात कर्णधार शुभमन गिल जायबंदी झाल्याने भारताचा आणखी एक फलंदाज कमी झाला त्याचाही फटका भारतीय संघाला बसला. कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजीतील तिसरा क्रमांक हा खूप महत्वाचा असतो. या क्रमांकावर खेळणारा फलंदाज हा संघाचा कणा असतो. संघ अडचणीत असताना एक बाजू लावून धरत धावफलक हलता ठेवण्याची जबाबदारी त्याची असते. राहुल द्रविड आणि चेतेश्र्वर पुजारा यांनी ही जबाबदारी चोख पार पाडली पण आता त्या क्रमांकावर चक्क फिरकी गोलंदाजाला खेळवण्यात येत आहे. संघ व्यवस्थापनाचा हा निर्णय चुकीचाच नव्हे तर मूर्खपणाचा वाटतो. हा संघ कसोटीसाठी निवडला आहे की टी २० साठी हेच समजत नाही कारण कसोटीत धावा करण्यासाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. ऋतुराज गायकवाड, श्रेयस अय्यर, साई सुदर्शन, अजिंक्य रहाणे यांच्याकडे कसोटी क्रिकेटचे तंत्र आहे पण त्यांच्याकडे संघ व्यवस्थापन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. संघ व्यवस्थापनाच्या याच चुकीमुळे न्यूझीलंडने भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश दिला होता. मागील वर्षी न्यूझीलंडने भारताला भारतात येईन ३ – ० ने हरवले होते. तेव्हाही न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांपुढे भारतीय फलंदाजी नांगी टाकली होती. आता त्याचीच पुनरावृत्ती दक्षिण आफ्रिका करतो की काय अशी भीती वाटते. कारण भारत प्रतिस्पर्धी संघासाठी फिरकीचे जाळे विणतो आणि या जाळ्यात स्वतःच अडकतो. न्यूझीलंड नंतर दक्षिण आफ्रिकन फिरकी गोलंदाजांनीही हे दाखवून दिले आहे. भारतीय फलंदाजांकडे फिरकी गोलंदाजी खेळण्याचे तंत्र नाही जी भारतीय फलंदाजी फिरकी खेळण्यास सर्वात सक्षम मानली जात होती तीच भारतीय फलंदाजी फिरकी गोलंदाजीपुढे कोलमडताना पाहणे खेदजनक आहे. आता दुसऱ्या कसोटीत तरी संघ व्यवस्थापनाने योग्य खेळाडूंची निवड करावी अन्यथा दक्षिण आफ्रिका देखील भारताला भारतात येऊन वाईट वॉश देण्याचा भीम पराक्रम करू शकतो.

# मेहकरमध्ये अभूतपूर्व चुरस! अध्यक्षपदासाठी २० तर नगरसेवकपदासाठी ३२५ उमेदवार

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या मेहकर नगरपरिषद निवडणुकीत यंदा अभूतपूर्व अशी चुरस पाहायला मिळत आहे. नगराध्यक्ष पदासाठी तब्बल २० उमेदवार, तर नगरसेवक पदासाठी ३२५ उमेदवारांनी नामांकन दाखल केले असून, एकूण ३४५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असलेल्या १७ नोव्हेंबरला उमेदवार आणि






कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. तेरा प्रभागांमधून २६ नगरसेवक आणि एका थेट निवडल्या जाणाऱ्या नगराध्यक्षपदासाठी विविध पक्षांसह अपक्ष उमेदवारही उत्साहाने पुढे आले आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)सह इतर पक्षांचे उमेदवार रिंगणात असल्याने मतदार कोणाला पसंती देणार याबाबत राजकीय वर्तुळात सजग चर्चा सुरू आहे. दाखल नामांकनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबरला होणार असून, अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर निश्चित आहे. त्यानंतरच निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल.

एकीकडे कडाक्याची थंडी आणि दुसरीकडे वाढते राजकीय तापमान यामुळे मेहकर शहरात निवडणुकीचे वातावरण दिवसेंदिवस तापत चालले आहे. यंदाच्या निवडणुकीत निर्माण झालेली चुरस गेल्या अनेक वर्षांत पहायला मिळाली नव्हती, अशी चर्चा मतदार आणि स्थानिक राजकारणात जोर धरत आहे.

## एमबीबीएस प्रवेशासाठी ३५ लाखांची फसवणूक, चंदीगडमधील आरोपीवर

**यवतमाळ/प्रतिनिधी :** मुलाला वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने घाटंजीतील एका सेवानिवृत्त प्राध्यापकाला तब्बल ३५ लाख रुपयांचा गंडा घातल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी घाटंजी येथील भगवान लक्ष्मणराव डोहाळे (६४) यांनी दिलेल्या तक्रारीवरून चंदीगड येथील सुशील मिश्रा व्यक्तीविरोधात घाटंजी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घाटंजी शहरातील अंबानगरी भागातील रहिवासी भगवान लक्ष्मणराव डोहाळे (वय ६४) यांनी ही आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दिली. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, भगवान डोहाळे यांनी मुलाच्या एमबीबीएस प्रवेशासाठी ऑनलाइन सर्च करत असताना चंदीगड येथे राहणाऱ्या सुशील मिश्रा हा त्यांच्या संपर्कात आला. त्याच्याशी चर्चा केल्यानंतर त्याने डोहाळे यांच्या मुलाला एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश निश्चित करून देतो, असे आश्वासन दिले होते.आरोपी मिश्रा याने सुरुवातीला डोहाळे यांचा पूर्ण विश्वास संपादन केला. तो सतत फोन कॉलद्वारे त्यांच्या संपर्कात राहिला. मुलाच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने डोहाळे यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. त्याने प्रवेश प्रक्रियेच्या नावाखाली, विविध शुल्क आणि औपचारिकता पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी मोठ्या रकमेची मागणी केली.डोहाळे यांनीही त्याच्या मागणीनुसार ती रक्कम हस्तांतरित केली. हा संपूर्ण फसवणुकीचा प्रकार २१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत घडला.

## वडील म्हणतात गडबड झाली, मुलगी म्हणते 'नितीश कुमार यांचा करिष्मा मान्यच करावा लागेल'

**पुणे/प्रतिनिधी :** बिहार विधानसभा निवडणूक निकालात 'एनडीए'ला एकतर्फी यश मिळालं असून, देशभरात या निवडणुकीची जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपाचे नेते हे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांचं कौतुक करत आहेत, तर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचाही जलवा निवडणूक निकालात पाहायला मिळाला. दरम्यान, या निकालावर विरोधी पक्षांनी टीका करत हा 'मॅनेज' निकाल असल्याचा आरोप सत्ताधारी पक्ष आणि निवडणूक आयोगावर केलाय. मात्र, दुसरीकडं विरोधी पक्षातीलच खासदार असलेल्या सुप्रिया सुळे यांनी निकालानंतर मुख्यमंत्री नितीश कुम ार यांचं कौतुत केलं आहे.

बिहार निकालात लालू यादव यांच्या पक्षाची मतं कमी झाली नाहीत, तर भाजपाचीही मतं वाढली नाहीत. मात्र, निकालात मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा करिष्मा दिसला आणि तो मान्यच करावा लागेल. तसंच ज्या काही आघाड्या झाल्या, त्यांना किती यश मिळालं असेल हे पाहावं लागेल. एनडीएनं बिहारची निवडणूक नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली लढल्यानं इतकं यश त्यांना मिळाल्याचं सांगत खासदार सुप्रिया सुळे यांनी नितीश कुमार यांचं कौतुक केलं.

बिहार निवडणुकीत महिलांच्या खात्यात दहा हजार रुपये टाकल्याच्या मुद्द्यावरून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर शंका उपस्थित होत असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली. होती सरकारी निधी मतदानावर प्रभाव टाकण्यासाठी वापरला गेला असेल, तर यामुळं लोकशाहीवरील विश्वास ढासळण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. मात्र, दुसरीकडं त्यांचीच कन्या व खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट मुख्यमंत्री नितीश कुमार यांचं कौतुक करत त्यांचा बिहारमध्ये करिष्मा असल्याचंही मान्य केलं. त्यामुळं विरोधी पक्षातीलच नेत्यांच्या वेगवेगळ्या भूमिका दिसून येत आहेत.

मुंढवा येथील जमीन खरेदीबाबत सुळे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या, ''या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मुख्यमंत्र्यांनी दिली पाहिजेत. ती चौकशी मुख्यमंत्र्यांनी लावली आहे. त्याम ुळं तेच सांगू शकतील. अंजली दमानिया वारंवार पर्दाफाश करत असतात. इमानदारीने त्या प्रयत्न करत असतात. भ्रष्टाचाराच्या विरोधात त्या लढत असतात. त्यांचं कितीही कौतुक केलं तरी ते कमी आहे.''वारजे आणि नवले पूल परिसरामध्ये वाहतूक कोंडीची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिक त्रस्त आहेत. वाहतुकीचं मॅनेजमेंट होताना दिसत नाही. पाणी, कचरा आणि वाहतूक कोंडीनं पुणेकर प्रचंड त्रस्त आहेत. आम्ही अनेक मार्ग सुचवले आहेत. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नाही हे दुर्दैव आहे,'' असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी पुण्यातील स्थानिक नेत्यांवर हल्लाबोल केला.

## किंग खानच्या फॅन फॉलोइंगचा नाद खुळा, शाहरुख खानच्या नावानं बांधतायत ४००० कोटींची बिल्डिंग; एका फ्लॅटची किंमत किती?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा किंग शाहरुख खानची क्रेझ फक्त देशातच नाहीतर, संपूर्ण जगभरात आहे. ज्यावेळी शाहरुखचे सिनेमे रिलीज होतात, त्यावेळी देशातील बॉक्स ऑफिस हादरतंच, पण वर्ल्ड वाईल्ड कलेक्शनचाही पाऊस पडतो. अरब देशांमध्ये तर शाहरुख खानच्या फिल्म्सचे कित्येक फॅन्स आहेत. तुम्हाला शाहरुखच्या फॅन फॉलोइंगचं उदाहरण द्यायचं झालं तर, शाहरुखच्या नावानं तब्बल ४००० कोटींची बिल्डिंग उभारली जातेय. तब्बल ५६ माळ्यांचा या टॉवरमध्ये कित्येक ॲमिनिटीज असणार आहेत. किंग खानच्या नावानं बांधली जात असलेली ही बिल्डिंग कुठे उभारली जातेय, हे माहितीय का?

नुकताच मुंबईत एक इव्हेंट पार पडला. या इव्हेंटमध्ये शाहरुख खान उपस्थित होता. याच इव्हेंटमध्ये शाहरुख खाननं त्याच्या नावानं बांधल्या जाणाऱ्या 'शाहरुख्ज डेन्यूब' नावाच्या इमारतीचं उद्घाटन केलंय. इमारतीचे शिल्पकार रिझवान साजन देखील उपस्थित होते. रिझवान साजन यांनी दुबईमध्ये शाहरुख खानच्या नावानं इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. शाहरुख खान त्यांच्या नावानं बांधल्या जाणाऱ्या इमारतीबद्दल खूप आनंदी आहे.

शाहरुख म्हणाला की, ''जर माझी आई आज असती तर तिला खूप आनंद झाला असता. हा एक मोठा सन्मान आहे... जेव्हा माझी मुलं येतील, तेव्हा मी त्यांना सांगेन, 'ते पाहा, त्यावर तुमच्या वडिलांचं नाव लिहिलंय. ही बाबांची बिल्डिंग आहे. मी कधीही कोणत्याही गोष्टीचं नाव, स्वत:च्या नावावर ठेवत नाही. माझी कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंट आहे आणि माझं घर मन्नत आहे... मी स्वत:ला इतकं महत्त्व देत नाही की, मी वस्तू घेईन आणि त्यावर माझं नाव लावेन... फक्त एखादा चित्रपट वगळता, कारण ते माझं काम आहे आणि ते माझ्यासाठी ईश्वरासमान आहे...''

कशी असेल 'शाहरुख्ज डेन्यूब'?

शाहरुखच्या नावानं बांधण्यात येणारी ही इमारत, 'शाहरुख्ज डेन्यूब', हा एक व्यावसायिक टॉवर आहे, जो २०२९ पर्यंत बांधून पूर्ण होईल. या म ालमत्तेची किंमत सुमारे ४,००० कोटी असण्याचा अंदाज आहे. या टॉवरमध्ये ५६ मजले असतील. मुस्लिम देशात पहिल्यांदाच मुस्लिम अभिनेत्याचा पुतळा बसवणं हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. टॉवरमध्ये हेलिपॅड आणि स्विमिंग पूल देखील असेल.

'शाहरुख्ज डेन्यूब'मध्ये काय सुविधा असणार?

शाहरुख खानच्या नावानं बांधण्यात येणारी ही इमारत २०२९ पर्यंत पूर्ण होईल. त्याची किंमत सुमारे ४,००० कोटी रुपये असेल. या इमारतीत ५६ म जले असतील, ज्यामध्ये हेलिपॅड आणि स्विमिंग पूल असेल. संपूर्ण इमारत १० लाख चौरस फूट जागेत बांधली जाईल.

दरम्यान, डेन्यूब प्रॉपर्टीज ही दुबईतील एक प्रमुख रिअल इस्टेट कंपनी आहे. ज्याची स्थापना रिझवान साजन या भारतीयानं केली आहे. रिझवान साजन अलिकडेच 'बिग बॉस १९' मध्ये डेन्यूबचं प्रमोशन करताना दिसलेला.

## दुर्धर आजारानंतरही संजय राऊतांमधील शिवसैनिक जागा झाला, मास्क लावून घराबाहेर पडले, स्मृतीस्थळ गाठून बाळासाहेबांना वंदन!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाकरे गटाची मुलुखमैदानी तोफ आणि विरोधकांना एकहाती शिंगावर घेणारे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत हे गेल्या काही दिवसांपासून सक्तीची विश्रांती घेत आहेत. त्यांना गंभीर आजार झाल्यामुळे डॉक्टरांनी सार्वजनिक जीवनापासून काही दिवस दूर राहण्याचा सल्ला दिला होता. हा सल्ला प्रमाण मानून संजय राऊत यांनी ३१ ऑक्टोबरला एक जाहीर पत्र लिहून पुढील दोन महिने मी सार्वजनिक जीवनापासून दूर राहणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर संजय राऊत यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु झाले होते. काही दिवसांपूर्वीच ते रुग्णालयातून घरी आले होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ते घरातून बाहेर पडले नव्हते. मात्र, सोमवारी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनी संजय राऊत कोणतीही तमा न बाळगता घराबाहेर पडले आणि दादरच्या शिवाजी पार्क येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेण्यासाठी पोहोचले.

संजय राऊत यांनी ३१ ऑक्टोबरपासून घराबाहेर पडणे पूर्णपणे बंद केले होते. मात्र, आज बाळासाहेब ठाकरे यांचा १३ वा स्मृतीदिन असल्याने त्यांना राहावले नाही आणि ते बाळासाहेबांच्या स्मारकाचे दर्शन घ्यायला घराबाहेर पडले. शर्ट-पँट अशा पेहरावात ते शिवाजी पार्कवर दाखल झाले. यावेळी संजय राऊत यांच्या तोंडाला संसर्ग टाळण्यासाठी मास्क लावलेला



होता. शिवाजी पार्कच्या परिसरात गाडीतून उतरल्यानंतर संजय राऊत हे त्यांचे बंधू सुनील राऊत यांचा हात पकडून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळापर्यंत चालत गेले आणि लाडक्या साहेबांचे दर्शन घेतले.

राज्यात २०१९ सालच्या सत्तानाट्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीपदी बसल्यापासून संजय राऊत हे म हाराष्ट्राच्या राजकारणाचा अविभाज्य भाग राहिले आहेत. त्यांनी म हाविकास आघाडीच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली होती. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना फुटल्यानंतर बहुतांश आमदार, खासदार आणि बडे नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत सत्ताधारी गटात दाखल झाले होते. मात्र, संजय राऊत यांनी शेवटपर्यंत उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नव्हती. ते दररोज पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाची बाजू जोरकसपणे मांडत होते. मात्र, ऐन मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर संजय राऊत यांना गंभीर आजार झाल्याचे निदान झाले. त्यामुळे संजय राऊत यांना सक्तीची विश्रांती घ्यावी लागली आहे.

सर्व मित्र परिवार आणि कार्यकर्त्यासाठी नम्र विनंती

जय महाराष्ट्र !

आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले. उपचार सुरू आहेत, मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणे व गर्दीत मिसळणे यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होऊन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# संवादातून, सर्वांच्या सहभागातून समृद्ध राज्य साकारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## २५ हजार सरपंचांसोबत मुख्यमंत्र्यांनी साधला ऑनलाईन संवाद

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सरपंच संवाद हा 'क्यूसीआय'ने तयार केलेला प्लॅटफॉर्म, देशभरातील सरपंचांचा हक्काचा प्लॅटफॉर्म आहे. आज त्याच्यावर पंचवीस हजार सरपंचांसोबत एकावेळी आपण संवाद साधत आहोत ही अभिनंदनीय बाब आहे. या संवादातून ग्रामविकासात आलेली प्रगल्भता लक्षात येते. अशा सशक्त संवादातून निश्र्चितपणे आपण समृद्ध राज्य आणि समृद्ध देश तयार करू, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी आयोजित क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाद्वारा तयार केलेल्या 'सरपंच संवाद' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर राज्यातील तब्बल २५ हजार सरपंचांनी ऑनलाईन सहभाग नोंदवत मुख्यमंत्र्यांसोबत थेट संवाद साधला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यमंत्री योगेश कदम, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, भारतीय गुणवत्ता परिषदेच्या नियामक मंडळ सदस्य हिमांशु पटे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यांच्या सह अन्य संबंधित उपस्थित होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ग्राम विकासाशिवाय राज्याचा व देशाचा विकास होऊ शकत नाही. केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांत ग्रामविकासाला प्राधान्य देत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला. महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या ग्रामसमृद्धीच्या संकल्पनेतील समृद्ध आदर्श गाव निर्माण करण्यासाठी गावाच्या विकासकामांमध्ये लोकसहभाग आणि नेतृत्व या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरणाऱ्या आहेत.

गावांच्या सर्वांगीण विकासासाठी सरपंच हे परिवर्तनकर्ते आहेत. गावाचे नेतृत्व सरपंच करतात. त्यामुळे सरपंचांची थेट निवडणूक ही परिवर्तनाची मोठी पायरी ठरल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासनाच्या योजना गावात पोहचवून गावांचा विकास करण्याचे काम सरपंच करतात. सरंपचांनी शेतकरी, महिला, बालक, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि महिला बचत गटांसाठी केंद्र-राज्य सरकारने दिलेल्या निधीचा सर्वोत्तम उपयोग करावा. कारण विविध योजना, अभियानातून गावांमध्ये मूलभूत काम उभे करता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जलयुक्त शिवार अभियानात राज्यात झालेले उल्लेखनीय काम ज्यामध्ये या योजनेने केवळ पाणी साठवणूक करत जलसंधारणाचेच काम केले नाही तर जलयुक्त शिवार अभियानातून गावात नेतृत्व, सामूहिक शक्ती यातून किती मोठ्या प्रमाणात परिवर्तन करता येते याची प्रचिती लोकांना आली. या अभियानाने शेतीतील प्रगतीची नवी दिशा दिली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामध्ये सगळ्या गावांनी अतिशय उत्तम काम केलं आहे. राज्यातील प्रत्येक गाव स्मार्ट ग्राम बनवण्याचा संकल्प व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फायबर नेटवर्कनंतर आता स्टारलिंकच्या सहकार्याने सर्वोत्कृष्ट इंटरनेट कनेक्टिव्हिटी गावापर्यंत दिली जाईल. स्मार्ट उपकरणांमुळे उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल, असे त्यांनी सांगितले.

सौर पंप योजनेत महाराष्ट्राचा लवकरच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

सौर पंप योजना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत असून, जागतिक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड महाराष्ट्राच्या नावावर होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. दिवसा पंप आणि रात्री घराला मोफत वीज - अशा खर्च बचतीच्या संकल्पना आता वास्तवात येत आहेत.

शासन नैसर्गिक शेतीची संकल्पना मिशन म्हणून राबवणार असून उत्पादन खर्च कमी करत शेतीला शाश्र्वत करण्यावर भर देत आहे.

राज्य सरकार दरवर्षी ५,००० कोटी कृषी क्षेत्रात गुंतवणूक करणार आहे कारण शेतीत गुंतवणूक केल्यावरच शेतीची उत्पादकता, आर्थिक लाभ वाढवता येणार असून महिला बचत गट, फूड प्रोसेसिंग, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण, शेतरस्ते, सौरग्राम, मूल्यशिक्षण अशा विविध योजनांच्या यशस्वी व्यापक अंमलबजावणीमुळेच खरा विकास शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

क्यूसीआय, व्हीएसकेसी आणि अनुलोम यांच्या माध्यमातून गावांना प्रशिक्षण, तांत्रिक मदत आणि उत्कृष्टतेची संधी मिळत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की, गुणवत्ता हीच खरी विकासाची गुरुकिल्ली आहे. विविध अभियान,स्पर्धा यांच्या माध्यमातून सरपंचांना नेहमी स्पर्धात्मक मोडमध्ये ठेवून प्रत्येक गावाला समृद्ध बनवण्याचा संकल्प सर्वांच्या सहभागाने यशस्वी करत समृद्ध महाराष्ट्र घडवू, असा विश्र्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

उल्लेखनीय काम करणाऱ्या सरपंचांसोबत संवाद साधून मुख्यमंत्री यांनी यावेळी सर्व सरंपचांचे अभिनंदन केले. यावेळी ग्रामविकास, शेती, जलसंधारण, महिला सबलीकरण आणि स्मार्ट गाव या विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मार्गदर्शन केले.

## ठाकरे बंधूकडून शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांना अभिवादन; एकोप्याचे क्षण, युतीला बळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आज (१७ नोव्हेंबर) १३ वा स्मृतिदिन आहे. या निमित्तानं, राज्यासह देशभरातून आदरांजली वाहण्यासाठी शिवसैनिक मुंबईतील शक्तीस्थळावर येत आहेत. अशातच आज शिवसेनाप्रमुखांच्या सृती दिनानिमित्त देशासह राज्यातील राजकीय नेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांना आदरांजली अर्पण केली आहे. तर दुसरीकडे याच निमित्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्याचे बघायला मिळेल आहे. स्मृतीदिनाच्या निमित्याने स्वर्गीय बाळासाहेबांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याचे दिसून आले. तब्बल अकरा वर्षांनी या शक्तीस्थळावर ठाकरे बंधू एकत्र आल्याचे बघायला मिळाले आहे. यावेळी रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि राज ठाकरेंसह मनसेचे प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते.

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर मनसे आणि शिवसेनेच्या युतीची जोरदार चर्चा आहे. तर त्याच अनुषंगाने अनेक मुद्यांवर वेळो वेळी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याचे दिसून येत आहे. अशातच बाळासाहेब ठाकरे यांच्या १३ वा स्मृतिदिनानिमित्य शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनामध्ये महत्वपूर्ण भाष्य केलं आहे. राज्याच्या राजकारणात दोन्ही ठाकरे बंधू पुन्हा एकत्र आले तर ती बाळासाहेबांना खरी आदरांजली असेल, अशा संदर्भात भाष्य केलंय. त्यामुळे आजच्या या भेटीला एक वेगळं महत्व प्राप्त झालं आहे. राज्यातील राजकीय समीकरण आणि वातावरण पाहता दोन्ही ठाकरे बंधू एकत्र यावेत, हीच देशभरातील शिवसैनिक आणि मनसैनिकांची मनातली इच्छा असल्याचे बोललं जात आहे. अशातच आज दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्याने हे दृश्य अनेकांसाठी समाधानकारक आहे.

दरम्यान, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे सहकुटुंब बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यासाठी पोहोचले. यानंतर मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यासह मनसे नेते बाळा नांदगावकर आणि नितीन सरदेसाई यांच्यासोबत बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर आदरांजली वाहिली. तर गेल्या अनेक दिवसांपासून आजारी असलेले आणि सार्वजनिक कार्यक्रमापासून लांब असलेले खासदार संजय राऊत आज मात्र बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करण्यासाठी आले होते. दुर्धर आजार होऊनही बाळासाहेबांसाठी संजय राऊत अखेर आज घराबाहेर पडलेत.

## मदिना जवळ बस-टँकर अपघातात ४२ भारतीयांचा मृत्यू

मदिना : मदिना जवळ उमराह यात्रेकरूंना घेऊन जाणारी बस आणि डिझेल टँकर यांची भीषण धडक होऊन ४२ भारतीयांचा मृत्यू झाला. मृतांपैकी बहुसंख्य जण तेलंगणातील हैदराबादचे होते. हा अपघात मक्काहून मदिनाला जात असताना मुफ्रीहाटजवळ पहाटे दीड वाजता झाला.

धडकेनंतर बसला आग लागल्याने अनेक प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. अनेक जण झोपेत असल्यामुळे मोठी जीवितहानी झाली. अहवालानुसार मृतांमध्ये ११ महिला आणि १० मुलांचा समावेश असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बस पूर्णपणे जळाल्याने ओळख पटवणे कठीण झाले आहे. मोहम्मद अब्दुल शोएब नावाचा एक प्रवासी जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल आहे. तेलंगणा सरकारने भारतीय दूतावासाशी संपर्क साधला आहे. राज्य सचिवालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी या घटनेवर शोक व्यक्त करत बाधित कुटुंबांना मदतीचे आश्वासन दिले आहे

## ठाकरेंची साथ सोडून शिंदे गटात गेलेल्या राजन साळवींना झटका, भाजपमुळे रत्नागिरीत मुलाला उमेदवारी नाकारली

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : रत्नागिरी नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेने (शिंदे गट) घेतलेल्या एका निर्णयामुळे स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेलेल्या माजी नगराध्यक्ष राजन साळवी यांचा मुलगा अथर्व साळवी यांना प्रभाग क्रमांक १५ मधून उमेदवारी नाकारण्यात आली आहे. यामुळे राजन साळवी यांना रत्नागिरी मोठा झटक्या बसल्याचे पाहायला मिळत आहे.

प्रभाग १५ मध्ये ट्विस्ट कायम

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १५ मध्ये शिवसेनेने अथर्व साळवी यांच्या ऐवजी जागा भाजपला सोडण्याची तयारी दाखवली आहे. तर दुसरा पर्याय म्हणजे भाजपमधील एखादा आयात उमेदवार घेऊन त्याला शिवसेनेत दाखल करून उमेदवारी देण्याची शक्यता आहे. या दोन पर्यायांमुळे प्रभाग १५ मधील राजकीय समीकरणांमध्ये ट्विस्ट कायम असल्याचे दिसून येते.

अथर्वचा प्रभाग म्हणजेच साळवी यांची ऐतिहासिक कारकीर्द

दरम्यान, प्रभाग क्रमांक १५ मधूनच राजन साळवी यांच्या राजकीय करिअरला सुरुवात झाली आहे. रत्नागिरीचे नगराध्यक्षपद देखील राजन साळवी यांनी भूषवले आहे. तर राजन साळवी यांचा मुलगा अथर्व राजन साळवी हे प्रभाग क्रमांक १५ मधून इच्छुक होते. मात्र शिवसेनेने राजन साळवी यांच्या मुलाला रत्नागिरी नगरपरिषदेमधून उमेदवारी नाकारली आहे.

राजन साळवी नाराज?

अथर्व साळवी यांना उमेदवारी न मिळाल्याने राजन साळवी नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. रत्नागिरी नगरपरिषद निवडणुकीत मुलाला उमेदवारी नाकारल्यानंतर आता उदय सामंत आणि राजन साळवी यांच्यात शीतयुद्ध रंगणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तर प्रभाग १५ अंतिमत: कोणत्या पक्षाकडे जाणार? राजन साळवी आता काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

असे असेल निवडणुकीचे टाईमटेबल

नामनिर्देशन पत्र - १० नोव्हेंबर

अंतिम मुदत - १७ नोव्हेंबर

छाननी - १८ नोव्हेंबर

अर्ज माघारी घेण्याची तारीख - २१ नोव्हेंबर

निवडणूक चिन्ह वाटप - २६ नोव्हेंबर

मतदान - २ डिसेंबर

निकाल - ३ डिसेंबर

## चाकण नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट; दोन्ही शिवसेना एकत्र

**पुणे/प्रतिनिधी** : राज्यभरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि शिवसेना पुन्हा एकत्र येणं अशक्य मानलं जात असतानाच चाकणमध्ये मात्र वेगळंच चित्र पाहायला मिळत आहे. खरं तर चाकण नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेकडून मनीषा गोरे यांची उमेदवार म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांचा नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाला दोन्ही पक्षांतील आमदार उपस्थित होते. शिवेसना (उबाठा) चे स्थानिक आमदार बाबाजी काळे आणि शिवसेनेचे आमदार शरद सोनवणे हे दोघेही एकत्र दिसल्यानं राजकीय वतुर्ळात विविध चर्चा रंगल्या. या अनपेक्षित एकत्रित उपस्थितीचा अर्थ काय असू शकतो? याबाबत अनेक कयास लावले जात आहेत.

स्थानिक भावनांना प्राधान्य देत निर्णय : या राजकीय चर्चांना विराम देत आमदार बाबाजी काळे यांनी स्पष्ट केलं की, त्यांचा हा निर्णय केवळ आणि केवळ स्थानिक राजकीय परिस्थिती तसंच दिवंगत आमदार सुरेश गोरे यांच्याप्रती असलेल्या आदरामुळे घेतला आहे. गटातटाच्या राजकारणापेक्षा स्थानिक भावनांना प्राधान्य देत घेतलेला हा निर्णय असल्याचं त्यांनी नमूद केलं.


## शब्दकोडे क्र. 12

आडवे शब्द

१. पोलिस ६. आत्याचा मुलगा ९. वजनदार १०. फळातील द्रव ११. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा १५. क्रिकेटमधील धाव १६. प्रतिबंध, विरोध १८. तमाशा १९. तोंडाचा एक भाग २१. रम्य २२. वेडावाकडा २४. मातीचा कण २५. चर्चा २७. भारतात वास्तव्य करणारे तिबेटी धर्मगुरु २८. शेतकरी (हिंदी) ३०. हाडांचा सापळा ३२. प्रत्येक दिवशी ३४. धमकी, श्वास ३६. व्रत, नियम ३८. चेहरा ४०. रामाच्या चरित्रावरील नाट्यप्रयोग ४२. शंकर ४४. मृत्यूनंतर शरीराचे केलेले दान ४६. नवरसातील एक रस ४७. विनंती ४९. आनंद ५०. ट्रीपला मराठी शब्द ५२. अजगर ५३. काळ्या तोंडाचे माकड ५५. सत्त्व ५७. शहाणा, चलाख ५९. घरोघर ६०. श्रीरामाचे स्तोत्र ६२. भितीवरून सरपटणारा प्राणी ६३. घर ६४. महिना ६५. समशेर, ढाल ---- ६७. चालू दिवस ६८. लहानसहान ७१. अभिनेता ७२. पंख ७३. वर्ण ७५. गाणे ७७. नोकरी करणारा ८०. जरीने भरलेले वस्त्र ८१. मांडणी, सजावट ८२. भीतीने होणारी थरथर ८३. पुष्पराग, सत्त्व, तमबरोबरचा तिसरा गुण

उभे शब्द

१. मावळ्यांची युद्धातील प्रोत्साहनपर घोषणा २. दिवस ३. जावई (हिंदी) ४. दारूचा एक प्रकार ५. यावर्षी (ग्रा.) ७. तीन दिवसाचे फूल ८. अवधान, लक्ष ९. भारताचे पहिले पंतप्रधान १२. चटकन १३. धट्टाकट्टी १४. धोबी १७. जास्तीत जास्त व कमीत कमी २०. हिंदीत मोठा २१. मला, वरचा माळा २३. संध्याकाळ २४. एखाद्याच्या बाजूने बोलणे, वकिली करणे २६. त्याप्रमाणे २९. मोठी नदी ३१. डावखोरा ३३. चित्तथरारक ३५. स्वत:ला ३७. मृत्यू ३९. रावण ४१. राजवाडा ४३. जल ४४. शरीर ४५. धमनी ४६. हाताचा तळवा ४७. लग्नसोहळा ४८. आशीर्वाद ५१. पैगंबर, राजा यांच्या नावापुढील बहुमानाचा शब्द ५२. पूर्ण भेदून जाणे ५४. नाशिकजवळून वाहणारी नदी ५६. मध्यम प्रमाण ५८. मुलगा, तनय ६१. धुणे ६४. मत्स्य ६६. मार्गक्रमण ६७. नौदल ६८. भाकरीचे एक धान्य ६९. खबदाड ७०. चषक ७२. अन्य, दुसरा ७४. मगज ७६. पान, पाकळी, तुकडी ७८. रचलेले कारस्थान ७९. निद्रा, झोप



### शब्दकोडे क्र. 11 चे उत्तर

आडवे उत्तर

१.जवळपास ४.वातहर ८.कापूर १०.राजा राणी १२.रडतराऊत १४.महाशय १७.सह १८.रुस १९.रसा २१.वरण २२.गारढोण २३.निवेदन २५.पारद २६.कमाई २७.भोवळ २८.चट २९.कुसर ३०.सहाय्यक ३२.तत्र ३३.सासर ३५.थाई ३६.आळ ३७.चऱ्हाट ३९.तबला ४१.वचक ४२.साव ४६.धाकधूक ४७.नवरानवरी ४८.रानभरी ५०.महामानव ५३.जरब ५४.खयाल ५५.रासवट ५७.तावदान ५८.चालवत ६०.कवाड ६१.नख ६३.हमाल ६६.जलपान ६८.दिवाळी ६९.जनगणना ७३.रबर ७४.दलाल ७५.आमदार ७६.राखण ७७.आरसा ७८.घण ७९.रजपज

उभे उत्तर

१.जखम २.पारायण ३.सजा ४.वाणी ५.हर हर महादेव ६.रड ७.आरास ८.कातरवेळ ९.रद्दी ११.राजकुमार १३.तरुण १५.हावरट १६.शरद १७.सगा २०.साद २३.निवड २४.नक्षत्र २५.पाचपोच २६.कसरत २९.कुस ३१.कथाकथन ३२.तळ ३३.साट ३४.कला ३६.आवकजावक ३८.ऱ्हास ४०.बकरी ४२.साधा ४३.पकड ४४.छान ४५.सोम ४७.नजरानजर ४८.राबता ४९.भरदार ५१.हालचाल ५२.वरात ५४.हालहवाल ५६.टवाळ ५९.वतनदार ६२.खलबत्ता ६४.माळी ६५.प्राण ६७.पार ६८.दिलासा ६९.जम ७०.गरज ७१.नाराज ७२.कणव ७४.दर ७५.आण

# अवैध गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या ४७ विना नंबर टिपर वाहनांवर जिल्हाधिकारी यांची धडक कारवाई

**– रविवारी सुट्टीच्या दिवशी अचानक धाडी एप्रिलपासून आतापर्यंत एकूण ८९७ प्रकरण अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई – यापैकी ४८३ विना नंबर टिपर वाहनावर कारवाई , ११० जणांवर गुन्हे दाखल**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाव्दारे विशेष मोहिम राबविली जात असून या मोहिमेअंतर्गत रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या नेतृत्वातील पथकाने अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या ४७ टिपर वाहनांवर दंडात्मक कारवाई करत १० लाखांहून अधिक दंडाची वसुली करण्यात आली. तसेच देऊळगांव राजा तालुक्यातील सिंनगाव जहाँगीर व खल्याळ गव्हाण परिसरात जिल्हाधिकारी विशेष पथकाव्दारे अवैध वाळू उत्खननाच्या ठिकाणी धाड टाकून संबधितांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

यापूर्वी १४ ऑगस्ट २०२५ व रोजी देखील जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अचानक अनेक ठिकाणी भेट देवून एकाच दिवशी ३० अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या विनानंबर टिपरविरुद्ध ६.५० लाखांची दंडात्मक कारवाई केली होती. याचपद्धतीची १९ मे २०२५ रोजी देखील कारवाई त्यांनी केली होती. नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेंतर्गत आतापर्यंत ८९७ प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली असून संबधित ११० वाहन चालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल, परिवहन, पोलीस व अन्य विभागाच्या संयुक्त कारवाईव्दारे जिल्ह्यात १ एप्रिल ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भात ८९७ प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली आहे. यापैकी ४१४ प्रकरणे अवैध उत्खनन, वाहतुक संबंधित आहेत. ४८३ विना नंबर वाहनांनवर कारवाई केली, तर ११० प्रकरणांत गुन्हे दाखल केले आहेत. या सर्व कार्यवाहीमधून जिल्हा प्रशासनाने एकूण ४ कोटी ८७ लाख रुपयाची दंडात्मक कारवाई केली आहे.





अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा महूसल, परिवहन, पोलीस व अन्य विभागाचे तालुकास्तरावर भरारी पथके कार्यरत आहेत. ही पथके गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करत आहेत. रॉयल्टी पासेस किंवा वाहतूक पासेस नसलेल्या वाहनांवर शासन नियमांनुसार दंडात्मक कारवाई केली जात आहे. नागरिकांना परिसरात कुठेही अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक होत असल्याचे आढळल्यास, त्यांनी संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार किंवा पोलीस विभागास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात अवयवदान जनजागृती कार्यक्रम संपन्न

**अवयवदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असल्याचा संदेश**




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : येथील जिल्हा रुग्णालय आणि बजाज हॉस्पिटल, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवयवदान जनजागृती कार्यक्रम दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजामध्ये अवयवदानाबाबत जागृती वाढविणे आणि त्याचे महत्त्व समजावून देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, वैद्यकीय अधीक्षक डॉ. घोटे, नेत्रतज्ज्ञ डॉ. रवी शिंदे, बजाज हॉस्पिटल, संभाजीनगर येथील डॉ. रोडे, (बाह्य रुग्ण विभाग) वैद्यकीय अधिकारी डॉ. घोंगटे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी, नेत्र समुपदेशक योगेश सिरसाट, श्री. जाधव तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात तज्ञांनी अवयवदानाचे सामाजिक, वैद्यकीय आणि मानवी मूल्यांवरील महत्त्व पटवून दिले. मृत्यूनंतरही अवयवदानाद्वारे अनेकांचे प्राण वाचू शकतात, हा अत्यंत संवेदनशील व प्रेरणादायी संदेश नागरिकांना देण्यात आला. अवयवदानाबाबतच्या विविध प्रक्रियांची माहिती, त्यावरील गैरसमज दूर करणे आणि सामान्य जनतेमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे मार्गदर्शनही कार्यक्रमात करण्यात आले.

## ठिकाण बाळासाहेबांचं स्मृतीस्थळ, राज ठाकरे अनब उद्धव ठाकरेंना एकत्र पाहून शिवसैनिक भावूक; दादरच्या शिवाजीपार्कमध्ये काय घडलं?

**मुंबई/प्रतिनिधी** : स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आज १३ वा स्मृतिदिन आहे आणि त्यानिमित्ताने अगदी सकाळी सात वाजल्यापासून राज्यभरातून शिवसैनिक दादर येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यासाठी येत आहेत. दरम्यान, माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे सहकुटुंब बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यासाठी पोहोचले. यानंतर मनसेप्रमुख राज ठाकरे देखील बाळा नांदगावकर आणि नितीन सरदेसाई यांच्यासोबत बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर आदरांजली वाहिली. बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन केल्यानंतर उद्धव ठाकरे, राज ठाकरे, आदित्य ठाकरे, चंदू मामा, रश्मी ठाकरे एकत्र स्मृतीस्थळी थोडावेळ बसले. गेल्या अनेक महिन्यात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे अनेकवेळा एकत्र दिसले. तसेच दिवाळी, भाऊबीजसह अनेक कार्यक्रमात ठाकरे कुटुंबही एकत्र आले होते. परंतु राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे ११ वर्षांनंतर दादरमधील बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यासाठी एकत्र दिसले. यावेळी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंची काहीवेळ चर्चाही झाली. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना एकत्र बघता उपस्थित शिवसैनिक भावनिक झाल्याचंही दिसून आले. प्रकृतीच्या कारणास्तव संजय राऊत यांनी ३१ ऑक्टोबरपासून घराबाहेर पडणे पूर्णपणे बंद केले होते. मात्र, आज बाळासाहेब ठाकरे यांचा १३ वा स्मृतीदिन असल्याने त्यांना राहावले नाही आणि ते बाळासाहेबांच्या स्मारकाचे दर्शन घ्यायला घराबाहेर पडले. शर्ट-पँट अशा पेहरावात ते शिवाजी पार्कवर दाखल झाले. यावेळी संजय राऊत यांच्या तोंडाला संसर्ग टाळण्यासाठी मास्क लावलेला होता.

# कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान घरोघरी तपासण्या

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत सर्व जिल्ह्यांमध्ये व्यापक सर्वेक्षणाद्वारे कुष्ठरोगाचे रुग्ण शोधण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

अभियानांतर्गत ८ कोटी ६६ लाख लोकसंख्या आणि १ कोटी ७३ लाख २५ हजार घरे सर्वेक्षणासाठी निवडली असून, ६५ हजार ८३२ पथके आणि १३ हजार १६६ पर्यवेक्षक या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात प्रत्येक पथक दररोज २० घरे तर शहरी भागात २५ ते ३० घरांना भेट देऊन प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करणार आहे. प्रत्येक पथकात एक आशा स्वयंसेविका आणि एक पुरुष स्वयंसेवक सहभागी असून, ते सलग १४ दिवस सर्वेक्षण करतील.

कुष्ठरुग्ण शोध अभियानाच्या राज्यस्तरीय जनजागरण समितीची बैठक नुकतीच आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला आरोग्य सेवा सहसंचालक (क्षयरोग व कुष्ठरोग) डॉ. राजरत्न वाघमारे, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, दूरदर्शन प्रतिनिधी डॉ. आलोक खोब्रागडे, आकाशवाणी मुंबईचे राजेश शेजवले, अलर्ट इंडियाचे वरिष्ठ प्रोग्रामर विन्सेंट के. ए., 'अपाल'चे अध्यक्ष माया रणवरे, महाराष्ट्र कुष्ठ पीडित संघटनेच्या सदस्या मदिना शेख, तसेच जनसंपर्क अधिकारी विकास सावंत या बैठकीला उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तसेच जिल्ह्याधिकारी व गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन करून आपल्या प्रभावी नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी केले आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी या अभियानाचा सखोल आढावा घेतला आणि सर्व जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले आहे. राज्यातील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले असून, कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत, प्रभावी आणि सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत सहज उपलब्ध असल्याची माहितीही आरोग्य विभागाने दिली आहे.

संशयित रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून, कुष्ठरोग निदान झाल्यास त्यांना तत्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येणार आहे. घरोघर तपासणी करून समाजातील लपलेले, निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणणे व संसर्गाची साखळी खंडित करणे, कुष्ठरोगाबाबत समाजात जनजागृती वाढवणे, सन २०२७ पर्यंत 'शून्य कुष्ठरोग प्रसार' या ध्येयाच्या दिशेने वाटचाल मजबूत करणे, ही या अभियानाची उद्दिष्ट्ये आहेत. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरावर सर्वेक्षणाविषयी मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली जात आहे. तसेच जिल्हा व तालुका स्तरावर समन्वय समित्या आणि प्रा.आ. केंद्रांवर पथक सदस्यांचे प्रशिक्षण सुद्धा सुरू आहे.



राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने नुकतेच कुष्ठरोगाला 'नोटिफायबल डिसीज' म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

## वृत्तविशेष...

### येणारा काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ : मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : आयुर्वेद या निसर्गाशी अनुरुप उपचार पद्धतीचे महत्त्व जगभरात मान्य झाले आहे. आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचारात वापर, संशोधन अशा विविध प्रकारे चालना दिली असून येणारा काळ हा आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सातार तांडा भागातील श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्धाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. प्रकरणाचा तपास सुरू : ''शुद्धीवर आल्यावर आपली फसवणूक झाल्याचं आजीच्या लक्षात आलं. यानंतर त्यांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. यानंतर पोलिसांनी विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करून प्रकरणाचा तपास सुरु केला. हा सर्व प्रकार जानेवारी २०२३ ते ११ नोव्हेंबर दरम्यान घडल्याचं तक्रारीत नमूद केलं आहे. आरोपींनी सुमारे २४ लाख ६० हजार रुपये आणि हिरे असा ऐवज लंपास केलाय. या गुन्हाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बी. आर. दराडे करत आहेत,'' अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांनी दिली.

### बिहारमध्ये नव्या सरकारच्या हालचालींना वेग; २२ नोव्हेंबरपूर्वी शपथविधीची शक्यता

पटना : बिहारमध्ये नवं सरकार येत्या २२ नोव्हेंबरपूर्वी स्थापन होईल, अशी माहिती केंद्रीय मंत्री आणि एलजेपीचे (रामविलास) प्रमुख चिराग पासवान यांनी दिली. त्यांनी सांगितलं की, विधानसभा निवडणुकीत एनडीए आघाडीला मिळालेल्या विजयामुळे सरकार स्थापनेची हालचाल वेगाने सुरू झाली आहे.

बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबरला संपत असल्याने, त्यापूर्वीच प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी चर्चा सुरू आहे. घटक पक्षांमध्येही मंत्रिमंडळ वाटप आणि पुढील धोरणांवर विचारमंथन सुरू असल्याचं समजतं.

विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएने अभूतपूर्व यश मिळवत २४३ पैकी २०२ जागांवर विजय मिळवला. भाजप ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष झाला तर जेडीयूने ८५ जागा जिंकल्या. लोक जनशक्ती पक्षाने १९, हिंदुस्थानी अवाम मोर्चाने पाच आणि राष्ट्रीय लोक मोर्चाने चार जागांवर विजय मिळवला.

महागठबंधनमधील आरजेडीने २५, काँग्रेसने सहा, सीपीआयएमएलएलने दोन, सीपीआयएम आणि आयआयपीने प्रत्येकी एक जागा जिंकली.

बीएसपीने एक तर एमआयएमने ५ जागांवर विजय मिळवला. नव्या कॅबिनेटमध्ये भाजपचं प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्रीपदासाठी नितीशकुमार यांचं नाव निश्चित मानलं जात आहे. नव्या मंत्रिमंडळात जेडीयूचे १४ आणि भाजपचे १६ मंत्री असतील तसेच भाजपकडे अनेक महत्त्वाची खाती असतील, असे समजते.

### नागपूर काँग्रेसमध्ये राजीनामा देण्याचा सपाटा; पक्ष नेतृत्वाच्या मनमानीला कंटाळून बड्या नेत्यांसह कार्यकर्त्यांचा पक्षाला रामराम

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : नागपूर जिल्ह्यातील काँग्रेस नेतृत्वाच्या मनमानीला कंटाळून जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांनी काँग्रेस पक्षाला राजीनामा देण्याचा सपाटा सुरू केला आहे. कामठीचे नगराध्यक्ष साजा शेख यांनी पक्ष नेतृत्वावर गंभीर आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केलाय. आपण सुनील केदार यांच्या हुकुमशाहीला कंटाळून राजीनामा दिल्याचे राजा शेख यांनी जाहिरपणे सांगितले. तर दुसरीकडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे महासचिव प्रसन्ना तिडके यांनी भाजप पक्षात प्रवेश केलाय.

जिल्ह्याचे नेतृत्व करणारे काँग्रेसचे नेते हे कार्यकर्त्यांसोबत भेदभावपूर्वक वागतात, गटबाजीला खतपाणी घालतात. त्यामुळे आपण भाजप पक्षात प्रवेश केल्याचे प्रसन्ना तिडके यांनी सांगितले. मागच्या चोवीस तासात साजा शेख, प्रसन्ना तिडके, रामटेकचे शहर अध्यक्ष दामोधर धोपटे या तीन मोठ्या पदाधिकाऱ्यासह दोनशे प्रमुख कार्यकर्त्यांनी काँग्रेसला रामराम ठोकला आहे.

दुसरीकडे, नागपूर जिल्ह्यात १५ नगर परिषद व १२ नगरपंचायात उमेदवारी अर्ज भरायचा आजचा शेवटचा दिवस आहे. मात्र काँग्रेसच्या बहुतांश उमेदवाराच्या हातात पक्षाचा एबीफार्म पोहचलेला नाही. बंडखोरी टाळण्यासाठी पक्षाच्या रणनीतीचा हा भाग असून ज्या उमेदवारांकडे एबीफार्म पोहचले नाही त्यांना सकाळी १० वाजतापर्यंत एबीफार्म सुपूर्द केले जाईल, असे काँग्रेसचे खासदार श्यामकुमार बर्वे यांनी सांगितले. मात्र पक्षाच्या रणनीतीचा हा भाग असल्याचे सांगितले जात असले तरी अर्ज भरायचा शेवटचा दिवस असतांना एबीफार्म हाती नसल्याने अनेक उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

नागपूर जिल्ह्यात नाही, तर देशपातळीवर संसदेपासून तर राज्यात विधमंडळापर्यंत काँग्रेस पक्षात उभी फूट पडेल हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच सांगितले आहे. नागपूर जिल्ह्यात पण हेच चित्र आहे.